**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१६
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

(क) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचे सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ख) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा दिनांक १ एप्रिल, २०१४ ते ३१ मार्च, २०१५ या कालावधीचा अंकेक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

| | | |
|---|---|---|
| **(२) महिला व बालविकास मंत्री** | : | विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **महिला व बालविकास विभागाची** सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाची योजनातंर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३) जलसंपदा मंत्री** | : | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अठरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(४) सामाजिक न्याय मंत्री** | : | महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : विधानसभा सदस्य अनुपस्थिती समिती (२०१५-२०१६) चा पाचवा अहवाल सादर करणे व त्यावर विचार करणे.**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री.अतुल भातखळकर, प्रा.देवयानी फरांदे, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, स्नेहलता कोल्हे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री नरेंद्र महेता, नरेंद्र पवार, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, सुनिल केदार, अमर काळे, सुनिल प्रभू, सुनिल शिंदे, डॉ. मिलिंद माने, डॉ.देवराव होळी, प्रा. राजु तोडसाम, सर्वश्री. संजय पुराम, डी. मल्लीकार्जून रेड्डी, सुधाकर देशमुख, सुधाकर कोहळे, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, जयदत्त क्षिरसागर, किसन कथोरे, राणा जगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, संग्राम जगताप, अजय चौधरी, विजय रहांगडाले, चरण वाघमारे, बच्चू कडू, शिरीष चौधरी, मोहन फड, महेश लांडगे, विनायकराव**

**जाधव-पाटील, डॉ.अनिल बोंडे, सर्वश्री. राहुल जगताप, राहुल मोटे, चंद्रदीप नरके, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. संजय केळकर, बळीराम सिरसकर, संजय पोतनीस, सदा सरवणकर, प्रकाश सुर्वे, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, सुरेश लाड, भास्कर जाधव, दिपक चव्हाण, हनुमंत डोळस, श्रीमती दिपीका चव्हाण, प्रा.वर्षा गायकवाड, श्रीमती निर्मला गावित, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री. डी.एस.अहिरे, अमिन पटेल, कुणाल पाटील, मो.आरीफ नसिम खान, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. तुकाराम काते, अनिल बाबर, अशोक पाटील, ॲड. गौतम चाबुकस्वार, ॲड. रामचंद्र अवसरे, श्री.अबू आझमी, सर्वश्रीमती तृप्ती सावंत, अमिता चव्हाण, सर्वश्री. सुरेश गोरे, गणपत गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील विविध भागांमध्ये कुपोषणाची असलेली गंभीर समस्या, गत वर्षभरात कुपोषणामुळे सुमारे १८ हजार बालकांचा झालेला मृत्यु, माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत सुमारे ८ हजार नवजात बालकांचा कुपोषणामुळे झालेला मृत्यु, मा.राज्यपाल महोदयांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत निदेश देऊनही त्याची शासनातर्फे अंमलबजावणी न होणे, डीएचआयएस - २ च्या अहवालावरुन राज्यात अर्भक मृत्यूदर ४० पेक्षाही जास्त असणाऱ्या दहा तालुक्यांमध्ये धारणी व चिखलदरा तालुक्याचा असलेला समावेश, तसेच राष्ट्रीय कुटुंब कल्याण आरोग्य सर्वेक्षणामध्ये राज्यातील पाच वर्षाखालील ३६ टक्के मुलांचे वजन व उंची विहित निर्देशांकापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील बालमृत्युबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी शासनास नोटीस बजावून केलेली विचारणा, राज्यातील नवजात अर्भके, एक ते सहा वयोगटातील बालके, स्तनदा माता, किशोरवयीन मुली इत्यादींसाठींच्या विविध योजनांमध्ये कोटयवधी रुपयांची तरतूद करण्यात येऊनही त्याचा प्रत्यक्षात लाभ न मिळणे, त्यामुळे बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यु रोखण्यासाठी पोषण आहार योजना अधिक काटेकोर व प्रभावीपणे राबवून तसेच बालकांच्या आरोग्य विषयक तपासण्या करुन औषधोपचार पुरविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **सर्वश्री. हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यासाठी स्थापन झालेल्या वसई उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची भाईंदर ते तलासरीपर्यंत असलेली हद्द, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा व तलासरी हे संपुर्णत: आदिवासीबहुल तालुके ठाणे परिवहन कार्यालयाशी संलग्न ठेवल्याने नागरिकांना

१५० ते २०० कि.मी. चे अंतर पार करुन ठाणे येथील परिवहन कार्यालयात जाऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांना सोसावा लागणारा आर्थिक भुर्दंड, विरार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय हे मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असल्याने येथे येणे-जाणे खुप सोईचे असून वसई उप प्रादेशिक **(RTO)** परिवहन कार्यालय विरार परिवहन कार्यालयाशी संलग्न करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे निवेदनाव्दारे मागणी करुनही त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, वसई उप प्रादेशिक परिवहन कार्यालय हे विरार परिवहन कार्यालयाशी संलग्न करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. राधाकृष्ण विखे पाटील, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमर काळे, अमित देशमुख, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"कृषी विभागाने माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये राज्यात मोहिम राबवून दुय्यम मिश्र खतांच्या घेतलेल्या ५४४ नमुन्यापैकी ५४१ नमुन्यांचे कृषी आयुक्तालयाला प्राप्त झालेले अहवाल, त्यापैकी ५०८ नमुन्यांचे अहवाल नकारात्मक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास येणे, केंद्र शासनाला मिश्र खत मान्य नसताना राज्य शासनाने दुय्यम मिश्र खत कारखान्यांना दिलेले परवाने, दर्जाहीन खत शेतकऱ्यांना विकून खत कंपन्यांनी केलेली फसवणुक याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या कृषी आयुक्तालयाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, मिश्र खत निर्मितीची परवानगी देण्यात येऊ नये, अशी कृषी तज्ज्ञांकडून होत असलेली मागणी, याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी शासनास दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ रोजी पत्राद्वारे संबंधितांवर कारवाई करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) विधेयक, २०१६.

---

**(ब) विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये सभागृहाने पुन्हा संमत करणे :-**

(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.

(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६.

(३) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६.

(४) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) विधेयक, २०१६.

(५) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६.

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१६.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(गुरुवार, दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : ॲड. आशिष शेलार, श्री. सुनिल प्रभू, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री.**

**सुरेश हाळवणकर, सुभाष साबणे, उन्मेश पाटील, संदिपान भुमरे, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. शंभूराज देसाई, सत्यजित पाटील, सुनिल शिंदे, हेमंत पाटील, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. हर्षवर्धन जाधव, किशोर पाटील, अनिल कदम, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"राज्यामध्ये बहुसंख्येने असणाऱ्या मराठा समाजाची अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी असणे, परंतु या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होणे, मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात स्थगिती मिळणे, उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी पुरावे व सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी मराठा आरक्षण समिती गठीत करणे, राज्यातील अनेक जिल्हयात मराठा समाजाचे प्रचंड शांततापूर्ण, शिस्तबध्द, मूक क्रांती मोर्चे निघणे, प्रस्थापित मराठा नेतृत्वाकडून झालेल्या अन्यायाविरोधातील आपल्या भावना मोर्च्यातून व्यक्त होणे, राज्य शासनाने आर्थिकदृष्टया दुर्बल मागास वर्गाची उत्पन्न मर्यादा ६ लाखापर्यंत वाढविली असणे,तसेच सर्व आर्थिक दुर्बल घटकांसाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व डॉ. पंजाबराव देखमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना सुरु करणे, कोपर्डी प्रकरणातील अत्याचार लक्षात घेता सदर प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून पिडीत महिलेला न्याय देण्याचा प्रयत्न करणे, मराठा समाजाच्या भावना लक्षात घेऊन शासनाने सुरु केलेल्या योजना व त्यावरील जनतेची असणारी प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**(गुरुवार, दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, अजित पवार, मो.आरिफ नसीम खान, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, राजेश टोपे, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री.शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, गोपालदास अग्रवाल, जितेंद्र आव्हाड, प्रा. वीरेंद्र जगताप, ॲड.के.सी.पाडवी, श्री.अब्दुल सत्तार, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री.अमीन पटेल, नितेश राणे, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. डी.पी.सावंत, अमर काळे, भास्कर जाधव, राहुल मोटे, दिलीप सोपल, सुनिल केदार, कालीदास कोळंबकर, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री.बाळासाहेब पाटील, श्रीमती निर्मला गावीत, श्री.जयकुमार गोरे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री.मधुकरराव चव्हाण, वसंतराव चव्हाण, राणा जगजितसिंह पाटील, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री.संग्राम थोपटे, बाळासाहेब थोरात, अमित देशमुख, काशिराम पावरा, कुणाल पाटील, राहुल बोंद्रे, भारत भालके, त्र्यंबक भिसे, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती.प्रणिती शिंदे, सर्वश्री.अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (मंत्र्यांचे उत्तर) :-**

" राज्यात मराठा, धनगर, मुस्लीम, लिंगायत, कोळी तसेच इतर मागास प्रवर्गाने नोकरी, शैक्षणिक आरक्षण व इतर सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून गेली वर्षभर राज्यभर काढलेले मुक मोर्चे व शांततापूर्ण मार्गाने केलेली आंदोलने, राणे समितीने मराठा समाजाला २० टक्के आरक्षण देण्याची केलेली शिफारस, घटनेनुसार ५० टक्क्याच्या वर आरक्षण देता येत नसले तरी तामिळनाडू राज्याने ६९ टक्के पर्यंत आरक्षणाबाबत केलेले सर्व्हेक्षण सर्वोच्च न्यायालयाने विचारात घेणे, त्या अनुषंगाने न्यायालयात बाजू मांडण्याऐवजी मराठा आरक्षणाबाबत न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यात मुदतवाढ मागून शासनाने केलेली चालढकल, निवडणुकीपूर्वी शासनाने मराठा, मुस्लीम व धनगर समाजाला दिलेले आश्वासन पाळण्यात न आल्यामुळे समाजात शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्यात मुस्लीम समाजाची आर्थिक स्थिती दयनीय असुन मुस्लीमांचे शासकीय नोकऱ्यांमधील केवळ दीड टक्का असलेले प्रमाण, मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबत याचिका दाखल करण्यात आली असता मुस्लीम मागास जातींना ५ टक्के शैक्षणिक आरक्षण कायम ठेवण्याचे न्यायालयाने दिलेले आदेश, याबाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबतचे आश्वासन देऊन दोन वर्ष होऊनही अद्याप निर्णय प्रलंबित असणे, मराठा, मुस्लीम, धनगर इ. समाजाने शांततेने मुक मोर्चे काढून इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता केलेली आरक्षणाची मागणी करुन घालून दिलेला आदर्श, यासंदर्भात शासनाने दाखविलेली उदासीनता व वेळकाढूपणा, परिणामी मराठा, धनगर, मुस्लीम समाजामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**दहा : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६ - **ॲड.पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४२ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४३ - महाराष्ट्र लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणा-या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१६ - **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

**अकरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

(**दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेले तथापि, पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव क्र १ ते ६**)

(१) **श्री. सुरेश भोळे, वि.स.स यांचा ठराव क्र.३४३**

"राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत पध्दतीने व योग्य प्रकारे पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स यांचा ठराव क्र.२३**

"मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करून त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. धनाजी अहिरे, वि.स.स यांचा ठराव क्र.२८३**

"तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २**

"ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारेपाणी शेतजमिनीत शिरून मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होवू नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यातील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३४४**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(६) **श्री.सुभाष पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६**

“कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्याहृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्हयांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या, दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युद्धपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ८ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.